ePaper
वर्ष - 9 I अंक -73 | UDYAM-MH-26-0158827

## चीनकडून पुन्हा विश्वासघात, भारताला सर्वात मोठा धक्का



# महाईन्यूज ™

### आतील पानांत


- मानधनाचं रिझर्व्ह बँकेकडून कौतुक
- "सर प्रॉमिस लक्षात आहे ना?
- बिहारमध्ये कुणाचं सरकार येणार?
- टॅरिफविरोधात न्यायालयात मांडणार बाजू


www.mahaenews.com I बुधवार, दि. 5 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक 2025** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर

# राज्यात पुन्हा लोकशाहीचा उत्सव!

## २ डिसेंबरला मतदान, ३ डिसेंबरला मतमोजणी; २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठी होणार सामना!

I मुंबई I प्रतिनिधी I
महाईन्यूज

**महाराष्ट्राच्या राजकीय विश्वात आज मोठी घडामोड घडली आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा अखेर अधिकृतपणे करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत हा महत्त्वाचा निर्णय जाहीर केला. महाराष्ट्रातील २०२५ च्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे राज्यात पुन्हा एकदा लोकशाहीचा उत्सव साजरा होणार आहे. १ कोटीहून अधिक मतदार २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठी आपले प्रतिनिधी निवडतील.**





२ डिसेंबर रोजी मतदान आणि ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार असून, राज्यातील राजकीय समीकरणांवर याचा मोठा प्रभाव पडणार आहे.

या निवडणुकांतून महाराष्ट्रातील स्थानिक नेतृत्वाची पुढील पिढी ठरवली जाणार आहे — आणि त्यामुळे या निवडणुकांकडे संपूर्ण राज्याचेच नव्हे, तर देशाचेही लक्ष लागले आहे.

या पत्रकार परिषदेला सचिव सुरेश काकाने, उपसचिव सूर्यकृष्ण मूर्ती, आणि उपायुक्त राजेंद्र पाटील उपस्थित होते.

या पत्रकार परिषदेद्वारे आयुक्त वाघमारे यांनी राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठी सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला. या सर्व निवडणुकांसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार असून, ३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी केली जाईल. यानंतर १० डिसेंबर २०२५ रोजी निकाल राज्य राजपत्रात प्रसिद्ध केला जाईल.

### राज्यातील एकूण निवडणुका आणि जागा

या निवडणुकांमध्ये २४६ नगरपरिषदां आणि ४२ नगरपंचायतींचा समावेश आहे. त्यापैकी १० नगरपरिषदा आणि १५ नगरपंचायती नव्याने स्थापन झाल्या आहेत. या निवडणुकांमध्ये एकूण ६,८५९ सदस्य आणि २८८ अध्यक्ष निवडले जाणार आहेत.

राज्यातील नगरपरिषदांमध्ये सदस्य संख्या २० ते ७५ दरम्यान असते. प्रत्येक प्रभागात साधारण दोन ते तीन सदस्य असतात. नगरपंचायतींसाठी प्रत्येकी १७ सदस्य आणि एक अध्यक्ष अशी संरचना असते. त्यामुळे मतदारांना दोन ते तीन सदस्यांसाठी मतदान करावे लागणार आहे.

### निवडणुकीचे संपूर्ण वेळापत्रक

- नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यास सुरुवात: १० नोव्हेंबर २०२५
- नामनिर्देशन दाखल करण्याची अंतिम मुदत: १७ नोव्हेंबर २०२५
- छाननीची तारीख: १८ नोव्हेंबर २०२५
- माघारी घेण्याची अंतिम तारीख (अपील नसल्यास): २१ नोव्हेंबर २०२५
- माघारी घेण्याची अंतिम तारीख (अपील असल्यास): २५ नोव्हेंबर २०२५
- निवडणूक चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी: २६ नोव्हेंबर २०२५
- मतदानाचा दिवस: २ डिसेंबर २०२५
- मतमोजणीचा दिवस: ३ डिसेंबर २०२५
- निकाल राजपत्रात प्रसिद्ध होण्याची तारीख: १० डिसेंबर २०२५

### मतदार संख्या आणि मतदान केंद्रे जिल्हानिहाय आणि विभागनिहाय निवडणुकीचे तपशील

**कोकण विभाग (एकूण २७):**
पालघर - ४, रायगड - १०, रत्नागिरी - ७, सिंधुदुर्ग - ४, ठाणे - २

**नाशिक विभाग (एकूण ४९):**
अहमदनगर - १२, धुळे - ४, जळगाव - १८, नंदुरबार - ४, नाशिक - ११

**पुणे विभाग (एकूण ६०):**
कोल्हापूर - १३, पुणे - १७, सांगली - ८, सातारा - १०, सोलापूर - १२

**छत्रपती संभाजीनगर विभाग (एकूण ५२):**
छत्रपती संभाजीनगर - ७, बीड - ६, धाराशिव - ८, हिंगोली - ३, जालना - ३, लातूर - ५, नांदेड - १३, परभणी - ७

**अमरावती विभाग (एकूण ४५):**
अमरावती - १२, अकोला - ६, बुलढाणा - ११, वाशिम - ५, यवतमाळ - ११

**नागपूर विभाग (एकूण ५५):**
भंडारा - ४, चंद्रपूर - ११, गडचिरोली - ३, गोंदिया - ४, नागपूर - २७, वर्धा - ६

### उमेदवारांसाठी खर्च मर्यादा निश्चित

- राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुकांसाठी उमेदवारांच्या प्रचार खर्चाची मर्यादा वाढवली आहे —
- 'अ' वर्ग नगरपरिषद: अध्यक्ष – ₹१५ लाख, सदस्य – ₹५ लाख
- 'ब' वर्ग नगरपरिषद: अध्यक्ष – ₹११.२५ लाख, सदस्य – ₹३.५० लाख
- 'क' वर्ग नगरपरिषद: अध्यक्ष – ₹७.५० लाख, सदस्य – ₹२.५० लाख
- नगरपंचायती: अध्यक्ष – ₹६ लाख, सदस्य – ₹२.२५ लाख
- डिजिटल सोयी — ऑनलाइन नामनिर्देशन आणि मतदार शोध सुविधा

या निवडणुकांमध्ये पारदर्शकता आणि सुलभता वाढवण्यासाठी आयोगाने ऑनलाइन नामनिर्देशन प्रणाली सुरू केली आहे. उमेदवारांना आयोगाच्या संकेतस्थळावरून अर्ज दाखल करता येईल. एका उमेदवाराला एका प्रभागात जास्तीत जास्त चार नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याची परवानगी असेल. जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य असून, ते प्रलंबित असल्यास अर्जाची पावती देणे आवश्यक आहे. मात्र उमेदवार निवडून आल्यास त्याला सहा महिन्यांच्या आत मूळ जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

### राज्यातील मतदार संख्येचे आकडे पुढीलप्रमाणे...

- पुरुष मतदार: ५३,७९,९३१
  महिला मतदार: ५३,२२,८७०
  इतर मतदार: ७७५
- एकूण मतदार: १,०७,०३,५७६

- मतदानासाठी एकूण १३,३५५ मतदान केंद्रे उभी केली जाणार आहेत. सर्व निवडणुका इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन (EVM) द्वारे पार पाडल्या जाणार आहेत.
- आरक्षण आणि सामाजिक प्रतिनिधित्व
- राज्यातील आरक्षणाचे गणित पुढीलप्रमाणे असेल:
- महिलांसाठी आरक्षित जागा: ३,४९२
- अनुसूचित जातींसाठी: ८९५
- अनुसूचित जमातींसाठी: ३३८
- मागासवर्गीय प्रवर्गासाठी: १,८२१
- या माध्यमातून सर्व समाजघटकांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रतिनिधित्व मिळेल.

## ९९ वे साहित्य संमेलन

## संयोजकांवर प्रश्नांची सरबत्ती

# कविता 20 ओळींहून अधिक ओळींची झाली

## संयोजकांच्या संयमाची परीक्षा



।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'गुगल टाइप म्हणजे काय?', 'कविता २० ओळींहून अधिक ओळींच्या झाल्या, तर चालणार नाहीत का?', 'हस्तलिखिताचे छायाचित्र जोडून पाठवले चालणार नाही का?', 'दोन कविता पाठवतो, त्यातून पाहिजे ती निवडाल काय?', 'निवेदनात पोस्टाने लिहिले आहे, कुरिअरने पाठवली तर चालणार नाही काय?'... कवींच्या अशा वैविध्यपूर्ण प्रश्नांच्या सरबत्तीने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या 'कविकट्टा' उपक्रमाच्या संयोजकांवर 'मी हजार शंकांमुळे हे डोके खाजवतो...' असे म्हणण्याची वेळ आली आहे.**

'कविकट्टा'मध्ये सहभागी होण्यास उत्सुक असलेल्या सुमारे हजार कवींच्या प्रत्येकी एक याप्रमाणे हजार प्रश्नांनी संयोजकांच्या संयमाची जणू परीक्षाच घेतली आहे. 'उदंड जाहले कवी'च्या धर्तीवर 'उदंड जाहल्या शंका' अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे.सातारा येथे जानेवारीमध्ये होत असलेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील 'कविकट्टा' उपक्रमाच्या संयोजन समितीची बैठक नुकतीच पार पडली. 'कविकट्ट्या'साठी आतापर्यंत ९६८ कवितांचा वर्षाव झाला आहे. कविता पाठविण्याची अंतिम तारीख १० नोव्हेंबर असल्याने हा आकडा नक्कीच एक हजारांहून अधिक असेल, असा विश्वास कविकट्टा उपक्रमाचे संयोजक राजन लाखे यांनी व्यक्त केला.माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार खेडोपाडी झाला असला, तरी ग्रामीण भागातील वयाने ज्येष्ठ कवींना ई-मेल करता येत नसल्याने त्यांनी टपाल विभागामार्फत कविता पाठविल्या आहेत.


आतापर्यंत १२९ कवींच्या कविता टपालाने आल्या असून, उर्वरित कवींनी ई-मेलचा आधार घेतला असल्याची माहिती लाखे यांनी दिली. याशिवाय, २९ कविता अशा आहेत की ज्यावर पत्ता आणि दूरध्वनी क्रमांकही नाही. असे जर झाले पुढील संपर्क होणार कसा, याकडे त्यांनी लक्ष वेधले.'विदर्भ, कोकण, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र आणि बृहन्महाराष्ट्र अशा विभागांतून कवींची निवड करण्याची प्रक्रिया १२ नोव्हेंबरपासून सुरू होईल. १५ नोव्हेंबरपर्यंत महाराष्ट्र, तसेच बृहन्महाराष्ट्रामधील जिल्हा आणि विभागानुसार प्राप्त प्राप्त झालेल्या कवींची यादी तयार होईल. त्यानंतर कविता निवड समितीतर्फे कवितांची निवड प्रक्रिया सुरू होईल. 'कविकट्ट्या'मध्ये निवड झालेल्या कवींना दूरध्वनी, टपाल किंवा मेलद्वारे २० नोव्हेंबरनंतर कळविण्यात येईल, जेणेकरून निवड झालेल्या कवींना सातारा येथे संमेलनात सहभागी होण्यासाठी रेल्वेचे आरक्षण करण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल,' असे ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील कविकट्टा उपक्रमाचे संयोजक राजन लाखे यांनी सांगितले.'कविकट्टा'मध्ये सहभागी होण्यास उत्सुक असलेल्या सुमारे हजार कवींच्या प्रत्येकी एक याप्रमाणे हजार प्रश्नांनी संयोजकांच्या संयमाची जणू परीक्षाच घेतली आहे. 'उदंड जाहले कवी'च्या धर्तीवर 'उदंड जाहल्या शंका' अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे.सातारा येथे जानेवारीमध्ये होत असलेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील 'कविकट्टा' उपक्रमाच्या संयोजन समितीची बैठक नुकतीच पार पडली. 'कविकट्ट्या'साठी आतापर्यंत ९६८ कवितांचा वर्षाव झाला आहे. कविता पाठविण्याची अंतिम तारीख १० नोव्हेंबर असल्याने हा आकडा नक्कीच एक हजारांहून अधिक असेल, असा विश्वास कविकट्टा उपक्रमाचे संयोजक राजन लाखे यांनी व्यक्त केला.माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार खेडोपाडी झाला असला, तरी ग्रामीण भागातील वयाने ज्येष्ठ कवींना ई-मेल करता येत नसल्याने त्यांनी टपाल विभागामार्फत कविता पाठविल्या आहेत.

### कवींची निवड करण्याची प्रक्रिया

आतापर्यंत १२९ कवींच्या कविता टपालाने आल्या असून, उर्वरित कवींनी ई-मेलचा आधार घेतला असल्याची माहिती लाखे यांनी दिली. याशिवाय, २९ कविता अशा आहेत की ज्यावर पत्ता आणि दूरध्वनी क्रमांकही नाही. असे जर झाले पुढील संपर्क होणार कसा, याकडे त्यांनी लक्ष वेधले.'विदर्भ, कोकण, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र आणि बृहन्महाराष्ट्र अशा विभागांतून कवींची निवड करण्याची प्रक्रिया १२ नोव्हेंबरपासून सुरू होईल.

# पुण्यात दोन दिवस आंतरराष्ट्रीय परिषद

## बंदरांचा विकास, समुद्र किनारपट्टी सुरक्षितेसंदर्भात संशोधन



।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'भारताच्या जागतिक सागरी केंद्राच्या उदयाचे प्रतिबिंब असलेल्या सागरी वाहतुकीत गेल्या दशकभरात सुमारे ७० टक्क्यांनी वाढ झाली आहे. मात्र, वातावरणीय बदल, हवामानातील अस्थिरता यामुळे समुद्री किनारपट्ट्या, बंदरे यांच्या दीर्घकालीन सुरक्षिततेबाबत नवीन आव्हाने निर्माण झाली आहेत,' अशी माहिती केंद्रीय जल आणि उर्जा संशोधन केंद्राचे ('सेंट्रल वॉटर अँड पॉवर रिसर्च स्टेशन -सीडब्लू अँड पीआरएस) संचालक डॉ. प्रभात चंद्रा यांनी दिली.**

### तंत्रज्ञानाचे आदान-प्रदान होईल

अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. प्रभात चंद्रा यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.भारतातील समुद्री किनारपट्टी, बंदरे दीर्घ काळ टिकून राहण्यासाठी 'सीडब्ल्यूपीआरएस' मोठे संशोधन करत आहे. सागरी अभियांत्रिकी परिषदेचे आयोजन करणे केवळ प्रतीकात्मक नसून, ते जलविद्युत आणि किनारी नवोपक्रमासाठी संस्थेच्या स्थायी भूमिकेस तसेच विज्ञान, धोरण, सराव आणि हवामान-सज्जता, किनारी विकास आणि शाश्वत सागरी वाढीसाठी यातून माहिती आणि तंत्रज्ञानाचे आदान-प्रदान होईल.

'सीडब्ल्यूपीआरएस' आणि भारतीय हायड्रोलिक्स सोसायटी (आयएसएच) यांच्या वतीने 'किनारपट्टी, बंदर आणि सागरी अभियांत्रिकी' या विषयावर ६ आणि ७ नोव्हेंबर असे दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद खडकवासला येथील 'सीडब्ल्यूपीआरएस'च्या आवारात होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.'किनारी विज्ञानापासून सागरी सामर्थ्यापर्यंत केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्र भारताच्या किनारी भविष्याचे नेतृत्व करते. भारताची सागरी आणि किनारी परिसंस्था त्याच्या आर्थिक आणि पर्यावरणीय चौकटीचा आधारस्तंभ आहे. या परिषदेमध्ये अभियंते, संशोधक, बंदर अधिकारी, उद्योजक आणि धोरणकर्ते सहभागी होणार आहेत. परिषदेतील चर्चासत्रांमध्ये एआय-चलित किनारी विश्लेषण, डिजिटल ट्विन मॉडेलिंग, शाश्वत गाळ उपसणी, समुद्र आणि त्याच्या सभोवतालच्या प्रदेशातील अक्षय ऊर्जा प्रणाली, हवामान-अनुकूलक बंदर रचना बंदर आणि बंदर विकास या पाच क्षेत्रांमध्ये ७० हून अधिक संशोधन पत्रे सादर केली जाणार आहेत.

## मुख्य टपाल कार्यालयाचा दर्जा

टपाल विभागाच्या सेवा अधिक सुलभ, जलद, दर्जेदार मिळणार

# चिंचवडमध्ये टपाल कार्यालयाचे मुख्यालय!

## तयारी अंतिम टप्प्यात ; महिन्याभरात नियमित कामकाजाला सुरुवात

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत सरकारच्या संचार मंत्रालयाने चिंचवड पूर्व उप टपाल कार्यालयाला मुख्य टपाल कार्यालयाचा दर्जा दिल्यानंतर आता प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात होण्यासाठीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. येत्या महिनाभरात मुख्यालयानुसार नियमित कामकाजाला प्रारंभ होणार आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना टपाल विभागाच्या सेवा अधिक सुलभ, जलद आणि दर्जेदार पद्धतीने मिळणार आहेत.**




चिंचवड टपाल कार्यालयात मुख्यालयाचे करण्यासाठी आवश्यक कार्यालयीन साहित्य, अंतर्गत दुरुस्ती, रंगरंगोटी, कार्यालयीन साहित्याचा पुरवठा आदी कामे सुरू करण्यात आली आहेत. यामुळे अतिरिक्त अधिकारी आणि कर्मचारी वर्गही उपलब्ध होणार आहेत. चिंचवड येथील टपाल कार्यालयाला मुख्यालयाचा दर्जा मिळावा, यासाठी राष्ट्रीय टपाल कर्मचारी संघटना वर्ग ३ चे सहायक क्षेत्रीय सचिव के. एस. पारखी, महाराष्ट्र-गोवा परिमंडळातील अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी संचार मंत्रालयाकडे पाठपुरावा केला होता. त्यांचा प्रयत्न यशस्वी ठरला आहे. मुख्यालयाच्या मान्यतेमुळे टपाल कर्मचाऱ्यांमध्ये उत्साह आहे.

> भारतीय टपाल विभागाने चिंचवड टपाल कार्यालयाचा दर्जा उन्नत करून मुख्य टपाल कार्यालय म्हणून केलेला आहे. नागरिकांनी टपाल सेवेच्या सर्व बचत योजना, जीवन वीमा योजना याचा लाभघ्यावा व भारतीय टपाल विभागाच्या व्यवसाय वृद्धी मोहिमेस व्यापक स्वरूप द्यावे.
> **-नितीन बने,** जनसंपर्क अधिकारी

### आता या कामांसाठी हेलपाटे वाचणार

यापूर्वी पिंपरी-चिंचवड उपविभागातील सर्व टपाल व्यवहार पुणे मुख्य टपाल कार्यालय (जीपीओ) मार्फत पार पडत होते. त्यामुळे नागरिकांना खाते पुनर्जीवन, जीवन विमा दावे, स्थित्यंतरण, हयातीचे दाखले आणि निधी वितरण यांसाठी पुण्याला जावे लागत होते.

---

# प्लास्टिक बंदीबाबत पिंपरी चिंचवड महापालिका सज्ज!

## नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर केली जाणार दंडात्मक व कायदेशीर कारवाई

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील प्लास्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन आता युद्धपातळीवर सक्रिय झाले आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेकडून ग्राहक व विक्रेत्यांविरुद्ध बंदी असलेल्या प्लास्टिकच्या वापरावर कारवाई सुरू करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. अशा प्रकारचा वापर आढळल्यास दंडात्मक कारवाई सोबतच कायदेशीर कारवाईदेखील करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागातून देण्यात आली.**




राज्य शासनाने १५ जुलै २०२२ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, प्लास्टिक लेप असलेल्या किंवा प्लास्टिक थर असलेल्या वस्तूंवर संपूर्ण बंदी लागू करण्यात आली आहे. या अधिसूचनेअंतर्गत पेपर किंवा ॲल्युमिनियमवर प्लास्टिकचा थर असलेले डिश, कप, प्लेट, वाडगे, कंटेनर, चमचे, ग्लास इत्यादी एकदाच वापरल्या जाणाऱ्या वस्तू पूर्णपणे बंदीच्या यादीत समाविष्ट आहेत.

या निर्णयाचा उद्देश दैनंदिन कचऱ्यातील प्लास्टिकचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी करणे हा आहे. कारण प्लास्टिकचे विघटन अत्यंत कठीण असून त्यातून गंभीर पर्यावरणीय प्रदूषण निर्माण होते. अनेक वेळा हा प्लास्टिक कचरा जलाशयांमध्ये फेकला जातो किंवा जाळला जातो, ज्यामुळे हवेचे आणि पाण्याचे प्रदूषण देखील वाढते.

अशी आहे दंडाची तरतूद :

पहिल्यांदा उल्लंघन आढळल्यास – ५,००० रुपये दंड
दुसऱ्यांदा उल्लंघन आढळल्यास – १०,००० रुपये दंड
तिसऱ्यांदा उल्लंघन आढळल्यास – २५,००० रुपये दंड आणि कायदेशीर कारवाई

### प्रभागनिहाय पथकांची नियुक्ती

पिंपरी चिंचवड महापालिकेने प्लास्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रभागनिहाय विशेष पथकांची नियुक्ती केली आहे. या पथकांना दंड आकारणी व जप्तीची कारवाई करण्याचे अधिकार दिले आहेत. दुकाने, बाजारपेठा तसेच मोठ्या किरकोळ केंद्रांवर नियमित तपासणी मोहीम राबवली जात आहे. तरी नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांच्या ऐवजी पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचा अवलंब करावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात येत आहे.


> पिंपरी चिंचवड महापालिकेकडून राबविण्यात आलेली प्लास्टिक बंदी मोहीम ही केवळ एक मोहिम नसून ती पर्यावरणाच्या संरक्षणाशी निगडित आहे. नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून कापडी पिशव्यांचा वापर वाढवावा. स्वच्छ, सुंदर आणि प्लास्टिकमुक्त पिंपरी चिंचवड शहर घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घ्यावा.
> **– विजयकुमार खोराटे,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> प्लास्टिकचा वापर थांबवण्यासाठी महापालिका जनजागृतीबरोबरच तपासणी मोहिमाही राबवत आहे. बंदी असलेले प्लास्टिक वापरणाऱ्यांवर कठोर दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. नागरिकांनी पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करून स्वच्छ, हरित आणि सुंदर शहर निर्मितीस हातभार लावावा.
> **– डॉ. प्रदीप ठेंगल,** उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका




**'सामाजिक न्याय' ही आधुनिक राजकीय तत्त्वज्ञानातील सर्वात जीवंत आणि वादग्रस्त संकल्पना आहे. ती जॉन रॉल्स याने त्याच्या 'A THEORY OF JUSTICE' (1971) ग्रंथातून नव्याने परिभाषित केली. त्यांनी FAIRNESS (न्यायतेचे तत्त्व) व DIFFERNCE PRINCIPLE (भिन्नतेचा सिद्धान्त) यावर आधारित एक उदारमतवादी न्यायतत्त्व मांडले.**

# सामाजिक न्यायाची संकल्पना बदलली



१९८० नंतर जगभरात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय बदल झाले. ज्यामुळे सामाजिक न्यायाची व्याख्या 'समान वाटप' या चौकटीपुरती मर्यादित न राहता ती अधिक बहुआयामी, आंतरसंवादी व मानवी क्षमतांवर आधारित झाली. जॉन रॉल्स यांच्या न्याय म्हणजे निष्पक्षता या सिद्धान्ताने विसाव्या शतकातील राजकीय तत्त्वज्ञानात फार मोठा बदल घडवला. कारण रॉल्सचे सामाजिक न्यायाचे तत्त्वज्ञान पूर्वीच्या न्याय तत्त्वज्ञानाच्या तुलनेत अधिक ठोस, पारदर्शक आणि सर्वसमावेशक आहे. त्याचा न्याय सिद्धान्त समाजातील दुर्बल घटकांसाठी विशेष कल्याणाची हमी देतो. रॉल्सच्या पुर्वीची न्यायाची संकल्पना वेगवेगळी होती. प्लेटोची न्याय संकल्पना ही प्रत्येकाने आपले योग्य कार्य करणे होय. तर युरोपीय तत्त्वज्ञानात हार्ट, काण्ट न्यायाच्या नैतिक व तात्त्विकता यावर भर देतात. पुढे अठराव्या व एकोणिसाव्या शतकात उपयोगितावादी सिद्धान्तानुसार जॉन स्टुअर्ट मिल व जेरमी बेंथमनुसार जास्तीत जास्त लोकांचे सुख म्हणजेच सामाजिक न्याय.जॉन रॉल्सच्या काळातील सामाजिक न्यायाच्या समकालीन संकल्पना ही त्याच्या 'न्याय म्हणजे समानता' या तत्त्वावर आधारित होती. एक न्यायाधारित समाज असा असतो ज्यामध्ये सर्वांना समान मूलभूत अधिकार आणि संधी मिळतात. रॉल्सच्या या तत्त्वज्ञानाने पारंपरिक उपयोगितावादाच्या संकल्पनेला आव्हान दिले. त्याच्या समकालीन राजकीय तत्त्वज्ञानानुसार समानता, स्वातंत्र्य आणि न्याय यांच्यामधला समतोल साधण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा सिद्धान्त सुद्धा अपुरा ठरू लागला. कारण जागतिक परिस्थितीत बदल झाला होता. जेव्हा रॉल्सचा 'A THEORY OF JUSTICE' (१९७१) हा ग्रंथ अमेरिकेत प्रचंड सामाजिक तणावाच्या काळात आला. त्यावेळी वांशिक भेदभाव, व्हिएतनाम युद्ध व स्त्रीवादी आंदोलन वाढले होते. समाजात वाढती आर्थिक विषमता आणि वर्गीय विभागणी दिसून येत होती. या सर्व पार्श्वभूमीवर रॉल्सने 'न्याय म्हणजे समाजातील संसाधनाचे न्याय्य वितरण' ही संकल्पना मांडली. 'न्याय हा समाजातील सर्वांत दुर्बल घटकाच्या हितासाठी असावा.' रॉल्सचा सिद्धान्त हा उदारमतवादी न्यायाचा प्रयत्न होता. म्हणजेच वैयक्तिक स्वातंत्र्य जपत समानतेचा शोध.पण १९८० नंतर नव-उदारमतवाद वाढल्यामुळे समाजात 'बाजारकेंद्रित न्याय' आणि 'व्यक्तिकेंद्रित स्पर्धा' वाढली. परिणामी रॉल्सच्या 'EQUALITY OF OPPORTUNITY' या संकल्पनेला मर्यादा आल्या. कारण बाजाराने विषमता वाढवली. १९८०-९० दरम्यान नॉन्सी फ्रेझर, आयरिश मारियन यंग व मार्था नुसाबम यांनी रॉल्सवर टीका केली. त्यांचा प्रश्न असा होता 'रॉल्सच्या सिद्धान्तात महिलांचे, अल्पसंख्यांकांचे आणि सामाजिक सत्तासंबंधाचे स्थान कुठे आहे?' त्यांनी दाखवून दिले की, रॉल्सने विवरणात्मक न्याय सांगितला पण सामाजिक ओळख, सन्मान आणि सहभागाचा विचार केला नाही. त्यामुळे नंतरच्या काळात न्यायाच्या संकल्पनेत RECOGNITION आणि PARTICIPATION हे नवे घटक आले. पुढे अर्मत्य सेन यांनी दाखवून दिले की, रॉल्सचा सिद्धान्त पश्चिमी समाजावर आधारित आहे.विकसनशील देशांत लोकांकडे मूलभूत क्षमता आणि संधीच नसतात. त्यामुळे समान वितरणाचा अर्थच बदलतो. सेन यांनी न्यायाची मोजणी RESOURCES वर नव्हे तर CAPABILTIES करावी असे सांगितले. त्यामुळे 'JUSTICE AS FAIRNESS' चे 'CAPABILITIES' असे परिवर्तन झाले. आजच्या काळात विषमता फक्त वर्गावर नाही तर तंत्रज्ञान, माहिती आणि शिक्षणातील विषमतेवर आधारित आहे. त्यामुळे रॉल्सचा राष्ट्रीय स्तरावरचा सिद्धान्त आता जागतिक न्याय (GLOBAL JUSTICE) या नव्या रूपात चर्चेत आला.

## प्रासंगिक »

### बांडगुळांचे बंड!

***सत्ताधीश-कंत्राटदार-प्रशासन यांच्या युतीची विषवल्ली इतकी खोल गेलेली आहे की तीवर बांडगुळे वाढली असून त्यांचीही खोडे आता धष्टपुष्ट होऊ लागली आहेत...***

कोणातरी नगरपालिकेच्या उच्चाधिकाऱ्याकडे नोटांची चळत सापडते. कोणा अधिकाऱ्याघरी तब्बल २३ कोटी रुपयांची सोन्याची बिस्किटे आढळतात. कोणी पाच-सहा अलिशान घरांचा धनी असतो. कोणी परदेशांतही संपत्ती करून असतो. त्याच वेळी सरकारी प्रकल्पांच्या कंत्राट रकमांत ३००-४०० टक्के वाढ होते. एकाही नागरिकाने कधीही मागितलेले नसतात अशा प्रकल्पांची कंत्राटे. अचानक सत्ताधीशांना पायाभूत सोयी-सुविधांच्या उभारणीत रस वाटू लागतो. ही कामे काही तरी कोणास तरी दिल्याखेरीज मिळत नाहीत. किंबहुना कामे कोणास द्यायची हे निश्चित झाल्यावरच कामे 'काढली' जातात. काही बडे कंत्राटदार सोडल्यास इतरांना त्यांच्या कामाचे सरकारी पैसे येत नाहीत. आले तरी कमालीच्या विलंबाने येतात. विलंब सहन करायचा आणि त्यातली 'कपात'ही गोड मानून घ्यायची. कारण 'कपात' होणार.

**राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेस आदी पक्षांचे 'महागठबंधन', 'एनडीए'मधील भाजप आणि नितीशकुमारांचा पक्ष तसेच नवा 'जन सुराज' पक्ष यांच्या जाहीरनाम्यांतून बिहारी जनतेच्या आकांक्षांचा निरनिराळा प्राधान्यक्रम लावला गेला आहे... त्या आकांक्षा काय आहेत आणि प्राधान्यक्रम कसा आहे?**

# जाहीरनामे बिहारबद्दल काय सांगतात?

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी दोन्ही फेऱ्यांचे मतदान येत्या सात दिवसांत संपेल आणि त्यानंतर पाच दिवसांनी, १४ नोव्हेंबर रोजी निकालही लागेल. या निवडणुकीकडे जणू नोकऱ्या, स्थलांतर आणि राजकीय आश्वासनांच्या विश्वासार्हतेबद्दलची जनमत चाचणी म्हणून पाहिले जाते आहे. राजद आणि तेजस्वी यादव यांचा प्रचार घरटी एकास सरकारी नोकरी देण्याच्या धाडसी आश्वासनावर केंद्रित आहे, त्यांच्या पक्षाच्या जाहीरनाम्याचे- 'तेजस्वी का प्रण'मधले- ते प्रमुख आश्वासन आहे. या जाहीरनाम्यात महिलांसाठी मासिक भत्ता आहेच पण 'बेटी' योजना ('बेनिफिट, एज्युकेशन, ट्रेनिंग, इन्कम' या शब्दांच्या आद्याक्षरांनुसार लाभ, शिक्षण, प्रशिक्षण, उत्पन्न) मुलींना सक्षम बनवण्याचे उद्दिष्ट ठेवते. शिवाय महिलांसाठी निवास, अन्न आणि उत्पन्न समर्थनावर लक्ष केंद्रित करणारी 'मा' योजना (मकान, अन्न, आमदनी- यांतील आद्याक्षरे! ) आहे. तेजस्वी यादव यांनी राज्य सरकारच्या सर्व




कंत्राटी कामगारांना नियमित करण्याचे वचन दिले आहे, तर अन्य आश्वासनांत २०० युनिटपर्यंत मोफत वीज, शेती कर्जमाफी, विस्तारित शिष्यवृत्ती आणि जुन्या पेन्शन प्रणालीकडे परत येणे यांचा समावेश आहे.

पंचायत प्रतिनिधींसाठी पेन्शन आणि ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण, दुप्पट भत्ते आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील कर्मचाऱ्यांसाठी जास्त नफा देण्याचे आश्वासनही या जाहीरनाम्यात आहे.मात्र ही आश्वासने आर्थिक वास्तवाशी जुळणे कठीण आहे. बिहारचा सार्वजनिक खर्च आधीच वाढलेला आहे आणि या राज्याची महसूल निर्मिती भारतातील सर्वात कमी आहे. बिहारचे दरडोई उत्पन्न राष्ट्रीय सरासरीच्या जवळपास निम्मे आहे, तर बेरोजगारी आणि अर्ध-बेरोजगारी देशाच्या सरासरीपेक्षा अधिक आहे. आव्हान केवळ आर्थिकच नाही तर संरचनात्मकही आहे. अनेक दशकांपासून बिहारने मोठ्या उद्योगांना आकर्षित करण्यासाठी, शेतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी आणि गतिमान खासगी क्षेत्राच्या उभारणीसाठी प्रयत्न केला. पण तरीही अद्याप सार्वत्रिक सरकारी रोजगाराचे स्वप्नच महत्त्वाचे ठरले आहे. म्हणजे हे राज्य अजूनही काम मागणाऱ्या हातांसाठी पुरेशा संधी निर्माण करण्यात अपयशी ठरलेले आहे. अर्थात,'घरटी एक सरकारी नोकरी' या आश्वासनाला बिहारच्या राजकारणात केंद्रस्थानी असलेल्या दोन मूल्यांची- समावेशन आणि सामाजिक न्याय यांची किनारदेखील आहेच.भाजप आणि मुख्यमंत्री नितीश कुमारांचा जद(यू) यांच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी एनडीएचा 'संकल्प पत्र' हा जाहीरनामादेखील अभूतपूर्व महत्त्वाकांक्षेचा म्हणावा लागेल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## ज्वारीचा पेरा सर्वाधिक

## ‘रब्बी’चे २ लाख १३ हजार ९९७ हेक्टर क्षेत्र

# साताऱ्यात रब्बीच्या 15 टक्केच पेरण्या

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आजअखेर साडेपाच महिने झालेतरी पाऊस कोसळतच असून, त्यामुळे जसे खरीप हंगामाचे गणित बिघडले, तशीच तऱ्हा रब्बी हंगामाची होत आहे. नोव्हेंबर महिना सुरू झाला तरी सातारा जिल्ह्यात रब्बीच्या केवळ १५ टक्के पेरण्याच झाल्या असून, महाबळेश्वर तालुक्यात पेरणीला सुरुवातच झालेली नाही.**

### महाबळेश्वर तालुक्यात पेरणीला सुरुवात



सातारा जिल्ह्यात रब्बी हंगामाचे एकूण क्षेत्र २ लाख १३ हजार ९९७ हेक्टर आहे. सध्या त्यापैकी ३२ हजार ७८६ हेक्टरवर पेरणी झाली असून, त्यात मक्याची पेरणी सर्वाधिक ३७ टक्के आहे. शेतशिवारात पेरण्यांची लगबग दिसत असलीतरी मान्सुनोत्तर पावसाने पेरण्यांची कामे खोळंबत आहेत.

अनेक ठिकाणी ऊसतोडणीही ठप्प होताना, पाल्याच्या झोपड्यात वास्तव्य करणाऱ्या ऊसतोड मजुरांचे प्रचंड हाल होत असल्याचे विदारक चित्र आहे. सध्या लांबलेल्या खरीप हंगामातील सोयाबीन, भुईमूग व भात पिकांची काढणी सुरू आहे.आवर्षणग्रस्त फलटण, माण, खटाव, कोरेगाव, ‘उत्तर कराड’मध्ये रब्बीच्या पेरण्यांनी जोर धरला आहे. सातारा जिल्ह्यात रब्बीचा पेरा १५ टक्केच आहे. त्यात ज्वारी २७ हजार ५०९, गहू १५६, मका ३ हजार ७५७, हरभरा १ हजार ८८, इतर कडधान्य २७४ हेक्टर असे मिळून ३२ हजार ७८६ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. सातारा तालुक्यात रब्बी हंगामात ज्वारी ४ हजार २३४, गहू २५, मका ४७, हरभरा १५५ हेक्टर अशा ४ हजार ४७३ हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. जावलीत ज्वारी ४९५ हेक्टर. पाटण तालुक्यात ज्वारी २ हजार ९०६, गहू ६५, मका ६४, हरभरा ५०६ हेक्टर अशा ३ हजार ५४८ हेक्टरवर तर, कराड तालुक्यात ज्वारी ७९४, हरभरा २४ अशा ८२० हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत.कोरेगाव तालुक्यात ज्वारी ६ हजार १४५, गहू ३०, हरभरा १५५ असे मिळून ६ हजार ५६१ हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. खटावमध्ये ज्वारी २ हजार २६, मका ४४५, हरभरा ४१ असे मिळून २ हजार ५१२, माण तालुक्यात ज्वारी ४ हजार २८९, गहू ७, मका १ हजार २३७, हरभरा ५८ असे मिळून ५ हजार ५९१ हेक्टर. फलटण तालुक्यात ज्वारी ४ हजार ३३७, गहू ७, मका १ हजार ९६२, हरभरा २९ हेक्टर असे मिळून ६ हजार ३३९ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. खंडाळा तालुक्यात ज्वारी ३१६, हेक्टर. वाई तालुक्यात ज्वारी १ हजार ९६९, गहू २२ हेक्टर अशा २ हजार १२८ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत.आजअखेर साडेपाच महिने झालेतरी पाऊस कोसळतच असून, त्यामुळे जसे खरीप हंगामाचे गणित बिघडले, तशीच तऱ्हा रब्बी हंगामाची होत आहे. नोव्हेंबर महिना सुरू झाला तरी सातारा जिल्ह्यात रब्बीच्या केवळ १५ टक्के पेरण्याच झाल्या असून, महाबळेश्वर तालुक्यात पेरणीला सुरुवातच झालेली नाही.

सातारा जिल्ह्यात रब्बी हंगामाचे एकूण क्षेत्र २ लाख १३ हजार ९९७ हेक्टर आहे. सध्या त्यापैकी ३२ हजार ७८६ हेक्टरवर पेरणी झाली असून, त्यात मक्याची पेरणी सर्वाधिक ३७ टक्के आहे. शेतशिवारात पेरण्यांची लगबग दिसत असलीतरी मान्सुनोत्तर पावसाने पेरण्यांची कामे खोळंबत आहेत. अनेक ठिकाणी ऊसतोडणीही ठप्प होताना, पाल्याच्या झोपड्यात वास्तव्य करणाऱ्या ऊसतोड मजुरांचे प्रचंड हाल होत असल्याचे विदारक चित्र आहे. सध्या लांबलेल्या खरीप हंगामातील सोयाबीन, भुईमूग व भात पिकांची काढणी सुरू आहे.आवर्षणग्रस्त फलटण, माण, खटाव, कोरेगाव, ‘उत्तर कराड’मध्ये रब्बीच्या पेरण्यांनी जोर धरला आहे. सातारा जिल्ह्यात रब्बीचा पेरा १५ टक्केच आहे. त्यात ज्वारी २७ हजार ५०९, गहू १५६, मका ३ हजार ७५७, हरभरा १ हजार ८८, इतर कडधान्य २७४ हेक्टर असे मिळून ३२ हजार ७८६ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत.

### ६ हजार ५६१ हेक्टरवर पेरण्या

सातारा तालुक्यात रब्बी हंगामात ज्वारी ४ हजार २३४, गहू २५, मका ४७, हरभरा १५५ हेक्टर अशा ४ हजार ४७३ हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. जावलीत ज्वारी ४९५ हेक्टर. पाटण तालुक्यात ज्वारी २ हजार ९०६, गहू ६५, मका ६४, हरभरा ५०६ हेक्टर अशा ३ हजार ५४८ हेक्टरवर तर, कराड तालुक्यात ज्वारी ७९४, हरभरा २४ अशा ८२० हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत.कोरेगाव तालुक्यात ज्वारी ६ हजार १४५, गहू ३०, हरभरा १५५ असे मिळून ६ हजार ५६१ हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत.

# मल्ल सिकंदर शेखला जामीन मंजूर

## सुप्रिया सुळेंनी मानले पंजाबच्या मुख्यमंत्र्यांचे आभार

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र केसरी आणि आंतरराष्ट्रीय पैलवान सिकंदर शेखला पंजाबमधल्या शस्त्रास्त्र तस्करी प्रकरणात जामीन मंजूर झाला आहे. सिकंदर शेखच्या नावावर या आधी कोणताही गुन्हा नव्हता, तसेच तो देशाचा मोठा पैलवान असल्याची बाब लक्षात घेऊन त्याला जामीन मंजूर करण्यात आला आहे.**

पंजाबमध्ये शस्त्रास्त्रांच्या तस्करी प्रकरणात सिकंदर शेखला अटक करण्यात आली होती. पंजाब पोलिसांनी सिकंदर शेखला शुक्रवारी केलेल्या अटकेमुळं महाराष्ट्रातल्या कुस्ती वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. पंजाबमधल्या पपला गुर्जर टोळीला शस्त्रास्त्रांचा पुरवठा करण्याच्या आरोपाखाली सिकंदरसह चौघांना अटक करण्यात आली होती. त्यापैकी तिघांची पार्श्वभूमीवर ही गुन्हेगारी स्वरुपाची होती. दरम्यान हा जामीन मंजूर झाल्यानंतर सुप्रिया सुळे यांनी पोस्ट करत पंजाबच्या मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत. महाराष्ट्राचा मल्ल सिकंदर शेख यास जामीन मंजूर करण्यात आला आहे. याप्रकरणी पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान जी यांच्या संपर्कात होते. न्यायालयात आज सिकंदरची बाजू वकिलांनी



अतिशय सक्षमपणे मांडली. अखेर त्याला आज जामीन मंजूर झाला असून तो लवकरच महाराष्ट्रात परत येईल. या संपूर्ण प्रकरणात पंजाबच्या मुख्यमंत्री महोदयांनी खुप सहकार्य केले याबद्दल त्यांचे मनापासून आभार. तसेच सिकंदरच्या वकिलांनी त्याची बाजू व्यवस्थितपणे मांडून त्याला जामीन मिळवून दिला, याबद्दल त्यांचेही मनापासून आभार. सिकंदर शेखला पंजाब पोलिसांनी शस्त्र तस्करी प्रकरणात अटक केली होती. पंजाब पोलिसांच्या पथकाने पपला गुर्जर गँगला शस्त्र पुरवणाऱ्या रॅकेटचा भंडाफोड करत चार जणांना अटक केली होती. त्यात सिकंदर शेखचाही समावेश होता. पोलिसांनी आरोपींकडून १ लाख ९९ हजार रुपये रोख रक्कम, पाच पिस्तुलं, काही काडतुसे आणि स्कॉर्पिओ-एन व एक्सयूव्ही अशा दोन गाड्या जप्त केल्या आहेत. या प्रकरणी पंजाबमधील खरड येथील पोलिस ठाण्यात आर्म्स अ‍ॅक्टअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या चार आरोपींपैकी सिकंदर शेखला जामीन मंजूर करण्यात आला आहे. तर उर्वरित तीन जणांचा जामीन नामंजूर करण्यात आला. त्या तीनही जणांवर या आधी खंडणी आणि इतर गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे.

### तीन आरोपींना जामीन नाही

सिकंदर शेखला अटक करण्यात आली होती. पंजाब पोलिसांनी सिकंदर शेखला शुक्रवारी केलेल्या अटकेमुळं महाराष्ट्रातल्या कुस्ती वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. पंजाबमधल्या पपला गुर्जर टोळीला शस्त्रास्त्रांचा पुरवठा करण्याच्या आरोपाखाली सिकंदरसह चौघांना अटक करण्यात आली होती.

उद्या निवडणुकीचा पहिला टप्पा

## ओपिनियन पोलचा अंदाज काय सांगतो?

# बिहारमध्ये कुणाचं सरकार येणार?

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बिहार विधानसभा निवडणुकीचा पहिला टप्पा ६ नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. १२१ जागांसाठी या टप्प्यात मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्याचा प्रचार आता संपला आहे ज्यानंतर ओपिनियन पोल समोर आले आहेत ज्यात पुन्हा एकदा एनडीए सरकार बिहारमध्ये स्थापन होईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसंच बिहारमध्ये भाजपा हा सर्वात मोठा पक्ष ठरेल असाही अंदाज वर्तवण्यात आला आहे.**

### काय सांगतात ओपिनियन पोल?



आयएनएस मॅटराइज म्हटलं आहे की एनडीएला १५३ ते १५६ जागा मिळू शकतात. विरोधी पक्षांच्या महाआघाडीला ७६ ते ८७ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. बिहारमध्ये निवडणुकीचा पहिला टप्पा ६ तारखेला पार पडणार आहे. त्याआधीच ओपिनियन पोलचा हा अंदाज समोर आला आहे. जदयूला ६१ ते ६५ जागा मिळतील तर चिराग पासवान यांच्या लोजपाला ४ ते ५ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर हिंदुस्थानी अवाम मोर्चाला या निवडणुकीत ४ ते ५ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विरोधकांच्या महाआघाडीबाबत ओपिनियन पोलमध्ये जो अंदाज वर्तवण्यात आला आहे त्यानुसार राजदला ६२ ते ६६ जागा मिळतील तर काँग्रेसला ७ ते ९ जागा मिळू शकतात असा अंदाज आहे. तर विकसनशील इन्सान पार्टीला १ ते २ जागा मिळतील असा अंदाज आहे. बिहार निवडणुकीच्या प्रचाराचा रणसंग्राम गेल्या महिन्याभरापासून रंगला आहे. आज प्रचाराच्या तोफा थंडावल्यानंतर ओपिनियन पोलचा अंदाज आला आहे.असदुद्दीन ओवैसी यांच्या AIMIM पक्षाला १ ते २ जागा मिळतील असा अंदाज आहे. प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाला १ ते ३ जागा मिळतील तर अपक्षांना १ ते ४ जागा मिळतील असा अंदाज आहे.

आयएनएस मॅटराइजने ओपिनियन पोल घेताना ७३ हजार २८७ लोकांशी चर्चा केली आहे. यामध्ये ३८ हजार १०९, १९ हजार ७८७ महिला आणि १५ हजार ३९० तरुणांचा समावेश होता. या सर्वेच्या अंदाजानुसार एनडीएला १३३ ते १४३ जागा मिळू शकतात. तर महाआघाडीला ९३ ते १०२ जागा मिळू शकतात.आयएनएस मॅटराइज म्हटलं आहे की एनडीएला १५३ ते १५६ जागा मिळू शकतात. विरोधी पक्षांच्या महाआघाडीला ७६ ते ८७ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. बिहारमध्ये निवडणुकीचा पहिला टप्पा ६ तारखेला पार पडणार आहे. त्याआधीच ओपिनियन पोलचा हा अंदाज समोर आला आहे. जदयूला ६१ ते ६५ जागा मिळतील तर चिराग पासवान यांच्या लोजपाला ४ ते ५ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर हिंदुस्थानी अवाम मोर्चाला या निवडणुकीत ४ ते ५ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विरोधकांच्या महाआघाडीबाबत ओपिनियन पोलमध्ये जो अंदाज वर्तवण्यात आला आहे त्यानुसार राजदला ६२ ते ६६ जागा मिळतील तर काँग्रेसला ७ ते ९ जागा मिळू शकतात असा अंदाज आहे. तर विकसनशील इन्सान पार्टीला १ ते २ जागा मिळतील असा अंदाज आहे.

बिहार निवडणुकीच्या प्रचाराचा रणसंग्राम गेल्या महिन्याभरापासून रंगला आहे. आज प्रचाराच्या तोफा थंडावल्यानंतर ओपिनियन पोलचा अंदाज आला आहे.असदुद्दीन ओवैसी यांच्या AIMIM पक्षाला १ ते २ जागा मिळतील असा अंदाज आहे. प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाला १ ते ३ जागा मिळतील तर अपक्षांना १ ते ४ जागा मिळतील असा अंदाज आहे. आयएनएस मॅटराइजने ओपिनियन पोल घेताना ७३ हजार २८७ लोकांशी चर्चा केली आहे. यामध्ये ३८ हजार १०९, १९ हजार ७८७ महिला आणि १५ हजार ३९० तरुणांचा समावेश होता. या सर्वेच्या अंदाजानुसार एनडीएला १३३ ते १४३ जागा मिळू शकतात. तर महाआघाडीला ९३ ते १०२ जागा मिळू शकतात.बिहार विधानसभा निवडणुकीचा पहिला टप्पा ६ नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. १२१ जागांसाठी या टप्प्यात मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्याचा प्रचार आता संपला आहे ज्यानंतर ओपिनियन पोल समोर आले आहेत

### आघाडीला किती जागा मिळतील?

ज्यात पुन्हा एकदा एनडीए सरकार बिहारमध्ये स्थापन होईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसंच बिहारमध्ये भाजपा हा सर्वात मोठा पक्ष ठरेल असाही अंदाज वर्तवण्यात आला आहे. आयएनएस मॅटराइज म्हटलं आहे की एनडीएला १५३ ते १५६ जागा मिळू शकतात. विरोधी पक्षांच्या महाआघाडीला ७६ ते ८७ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.बिहारमध्ये निवडणुकीचा पहिला टप्पा ६ तारखेला पार पडणार आहे.

# टॅरिफविरोधात न्यायालयात मांडणार बाजू

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयाला भारतीय वंशाचे वकील देणार आव्हान

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी "देशाच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या प्रकरणांपैकी एक" म्हणून वर्णन केलेल्या खटल्याचा युक्तिवाद करण्यासाठी भारतीय वंशाचे अमेरिकन वकील नील कात्याल बुधवारी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात हजर राहणार आहेत.**

१९७७ च्या आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक अधिकार कायद्याअंतर्गत टॅरिफ लादण्याचा अधिकार अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना आहे की अमेरिकन काँग्रेसला, हे या खटल्यात ठरवले जाईल.५४ वर्षीय भारतीय वंशाचे नील कात्याल हे याचिकाकर्त्यांचे प्रमुख वकील आहेत. नील कात्याल राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना टॅरिफ लादण्याचा अधिकार नसून, तो अमेरिकन काँग्रेसला आहे, असा युक्तिवाद करतील.माझ्या मते, हा अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या सर्वात महत्त्वाच्या आणि परिणामकारक निर्णयांपैकी एक असेल. जर आपण जिंकलो तर आपण जगातील सर्वात श्रीमंत आणि सर्वात सुरक्षित देश असू. जर आपण हरलो तर आपला देश जवळजवळ तिसऱ्या जगातील देशांच्या दर्जापर्यंत घसरू शकतो. त्यामुळे देवाला प्रार्थना करा की




असे होऊ नये!", असे डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी ट्रुथ सोशलवरील एका पोस्टमध्ये म्हटले होते. डोनाल्ड ट्रम्प यांनी ते स्वतः या सुनावणीला उपस्थित राहणार असल्याचे घोषित केले होते, परंतु नंतर त्यांनी हा निर्णय रद्द केला.

नील कात्याल हे अमेरिकन कायदा वर्तुळातील एक प्रमुख व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात ५० हून अधिक खटले लढवले आहेत. २००० मध्ये बुश विरुद्ध गोर खटल्यात उपराष्ट्रपती अल गोर यांचे सह-

### न्यायालयात हजर राहणार

हायस्कूल लोयोला अकादमीमध्ये प्राथमिक शिक्षण घेतले होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी "देशाच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या प्रकरणांपैकी एक" म्हणून वर्णन केलेल्या खटल्याचा युक्तिवाद करण्यासाठी भारतीय वंशाचे अमेरिकन वकील नील कात्याल बुधवारी अमेरिकेच्यान्यायालयात हजर राहणार आहेत.

सल्लागार म्हणून त्यांनी काम केले होते. तेव्हा ते राष्ट्रीय स्तरावर पहिल्यांदा चर्चेत आले होते.गेल्या काही वर्षांत नील कात्याल यांनी ट्रम्प प्रशासनाने सुरू केलेल्या धोरणांना वारंवार आव्हान दिले आहे. म्हणून अमेरिकेत त्यांना "ट्रम्प टॉरमेंटॅर" म्हणून ओळखले जाते. 'ील कात्याल यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या पहिल्या कार्यकाळात मुस्लिमबहुल देशांतील नागरिकांच्या अमेरिकेत प्रवेशबंदीविरोधात आणि त्यांच्या हद्दपारीविरोधात अमेरिकन सरकारच्या निर्णयाला आव्हान दिले होते.शिकागोमध्ये भारतीय स्थलांतरित पालकांच्या पोटी जन्मलेल्या नील कात्याल यांची आई प्रतिभा या डॉक्टर आहेत, तर वडील अभियंता होते.

# मराठी चित्रपटांचे बजेट कमी, मग तिकिटांचे दर कमी का नाही?

अभिनेता गश्मीर महाजनी हा त्याच्या अभिनयामुळे ओळखला जातो. त्याचा चाहतावर्ग मोठा आहे. गेल्या काही दिवसांत तो पडद्यावर दिसला नसला तरी तो सोशल मीडियाच्या माध्यमातून कायमच प्रेक्षकांच्या संपर्कात असतो. गश्मीर सोशल मीडियावर अनेकदा चाहत्यांशी थेट संवाद साधतो. आस्क गश या सेशनमध्ये तो चाहत्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे देतो. चाहते अनेकदा त्याला तो पुन्हा अभिनयाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला कधी येणार आहे, असे प्रश्न विचारतात.कधी त्याला त्याच्या खासगी आयुष्याबद्दलही प्रश्न विचारतात. काही जण त्याच्यावर प्रेम असल्याचे सांगतात; तर काही जण त्याला त्यांच्या आयुष्यातील अडचणींवर मात करण्यासाठी मार्ग विचारतात. गश्मीरदेखील या सर्व प्रश्नांची कधी गमतीने, कधी गंभीरतेने, संयमाने उत्तरे देत असल्याचे दिसते.आता नुकताच 'आस्क गश' या सेशनमध्ये एका चाहत्याने त्याला विचारले की, गश्मीर जर



मराठी चित्रपटांचे बजेट कमी आहे, तर मग तिकिटांचे दर कमी का नाहीत? त्यावर गश्मीर म्हणाला, "तिकिटांचे दर वाढविण्यापेक्षा आपण चित्रपट निर्मितीचा दर्जा वाढवण्याबद्दल विचार केला पाहिजे. आधी चांगले चित्रपट बनवले पाहिजेत आणि त्यानंतर पैशाबद्दल विचार केला पाहिजे; हे साधं गणित आहे."त्याबरोबरच एकाने विचारले की, तुझा आगामी प्रोजेक्ट कधी येणार? त्यावर अभिनेता गश्मीर म्हणाला, "फेब्रुवारीमध्ये शूटिंग करणार आहे. २०२६ मध्ये प्रदर्शित होणार आहे", आणखी एकाने विचारले की कोणत्या दिग्दर्शकाबरोबर काम करायचे आहे? त्यावर गश्मीरने श्रीराम राघवन यांचे नाव घेतले. एकाने विचारले की, तुझ्या कोणत्या चित्रपटाचा तुला सीक्वेल काढायला आवडेल? त्यावर अभिनेत्याने कोणत्याच नाही, असे उत्तर दिले. अशा अनेक प्रश्नांची उत्तरे गश्मीरने दिली आहेत.गश्मीरने याआधीही अनेकदा तो २०२६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचे सांगितले आहे. गश्मीर अभिनयाबरोबरच त्याच्या नृत्यासाठीदेखील ओळखला जातो.

## तर माझं मेलेलं तोंड बघाल

बॉलीवूडमधील सर्वोत्तम चित्रपटांपैकी एक म्हणून जंजीर या सिनेमाला गणले जाते. अमिताभ बच्चन यांनी प्रमुख भूमिका साकारलेला हा सिनेमा चांगलाच गाजला होता. अमिताभ बच्चन यांची चित्रपटातील अँग्री यंग मॅन भूमिका प्रेक्षकांना आवडली होती. जंजीर चित्रपटाची पटकथा सलीम खान व जावेद अख्तर यांनी लिहिली होती, तर चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन प्रकाश मेहरा यांनी केली होती. मात्र, अमिताभ बच्चन हे या चित्रपटासाठी पहिली निवड नव्हते. धर्मेंद्र यांना या चित्रपटासाठी विचारले होते. मात्र, त्यांनी या चित्रपटाला नकार दिला. त्यानंतर अमिताभ बच्चन यांनी जंजीर या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली, असे वक्तव्य जावेद अख्तर यांनी केले होते. आता बॉबी देओलने त्याच्या वडिलांनी म्हणजेच दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांनी या ब्लॉकबस्टर चित्रपटाला का नकार दिला याचे भावनिक कारण सांगितले आहे. बॉबी देओलने नुकताच इन्स्टंट बॉलीवूडशी संवाद साधला. यावेळी त्याला विचारण्यात आले की, त्याने किंवा त्याच्या कुटुंबातील इतर कोणी कोणाला मदत करण्यासाठी एखादा चित्रपट केला आहे का? यावर बोलताना बॉबी देओल म्हणाला, "माझ्या मावशीचे पती हे आर्थिक अडचणीत होते, त्यांच्यासाठी त्यांनी सत्यकाम हा चित्रपट केला होता.

## अथियाने शेअर केला मुलीचा फोटो



अभिनेत्री अथिया शेट्टी व केएल राहुल नुकतेच आई-बाबा झाले. अथियाने एका गोंडस मुलीला जन्म दिला. अथिया व केएल राहुलची लाडकी लेक तीन आठवड्यांची झाली आहे. त्यांनी आता त्यांच्या मुलीचं नाव जाहीर केलं आहे. इतकंच नाही तर या जोडप्याने लेकीबरोबरचा एक सुंदर फोटोही पोस्ट केला आहे. अथिया शेट्टीने २४ मार्च रोजी मुलीला जन्म दिला. अथिया व केएल राहुल यांचं हे पहिलंच बाळ आहे. बाबा झाल्यावर केएल राहुल आयपीएलचा सामना सोडून मुंबईत आला होता. अथियाने आता इन्स्टाग्रामवर एक फॅमिली फोटो पोस्ट केला आहे. या फोटोच्या कॅप्शनमध्ये त्यांनी मुलीचं नाव सांगितलं आहे.फोटोमध्ये केएल राहुलने लाडक्या लेकीला जवळ घेतलंय आणि अथिया तिच्याकडे प्रेमाने बघतेय. "आमची लाडकी लेक, आमचं सर्वस्व. अथिया शेट्टीच्या या पोस्टवर चाहत्यांनी तसेच कलाकारांनी लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव केला आहे. अनुष्का शर्मा, मलायका अरोरा, समांथा रूथ प्रभू यांनी या पोस्टवर रेड हार्ट इमोजी कमेंट केले आहेत. अनेकांना अथिया व केएल राहुल यांनी त्यांच्या मुलीसाठी जे नाव निवडलं ते आवडलं असून कौतुक केलं आहे.अथिया शेट्टी व केएल राहुल यांनी काही वर्षे एकमेकांना डेट केल्यावर दोन वर्षांपूर्वी २३ जानेवारी २०२३ रोजी लग्नगाठ बांधली. या दोघांचे लग्न सुनील शेट्टीच्या खंडाळा येथील फार्म हाऊसवर पार पडलं होतं. या लग्नाला फक्त दोघांचे कुटुंबीय आणि क्रिकेटविश्वातील व सिनेइंडस्ट्रीतील काही मोजकेच लोक उपस्थित राहिले होते. लग्नाला दोन वर्षे पूर्ण होताच या

## एकट्यात माझ्याशी फ्लर्ट करते आणि....

'बिग बॉस १९'च्या खेळाला आता जवळपास ७० दिवस झाले आहेत. हळूहळू हा शो आता अंतिम टप्प्याकडे जात आहे. शोमधील काही स्पर्धकांचा प्रवास संपला आहे; तर उर्वरित सदस्यांपैकीही एकेक जण आता घरातून बाहेर पडणार आहे. 'बिग बॉस'च्या घरातील सर्वांनाच आता एकमेकांचे स्वभाव माहीत झाले आहेत. बिग बॉसच्या घरात स्पर्धकांचं एकमेकांबरोबर नातं तयार होतं; पण ही नाती काही शेवटपर्यंत टिकत नाहीत. 'बिग बॉस १९' सुरू होताच सुरुवातीला काही नाती तयार झाली. मात्र, आता त्या प्रत्येक नात्यात दुरावा येत आहे आणि या दुराव्याचं कारण म्हणजे भांडण. 'बिग बॉस'च्या घरात तान्या आणि शेहबाज हे दोघे एकमेकांचे चांगले मित्र होते. दोघे एकमेकांना भाऊ-बहीणही मानतात. मात्र, आता या भाऊ-बहिणीच्या नात्यात दुरावा येणार आहे. दोघांमध्ये आजच्या भागात भांडण होणार आहे'बिग बॉस १९'च्या आजच्या भागाचा प्रोमो नुकताच समोर आला आहे आणि या प्रोमोत शेहबाजनं त्याची लाडकी बहीण तान्याची सर्वांसमोर पोलखोल केली आहे. या प्रोमोमध्ये शेहबाज घरातील स्पर्धकांना म्हणतो, "मी आता हिचा खरा चेहरा सर्वांसमोर आणणार आहे. कोणत्याही छोट्या गोष्टीवर रडत बसते आणि हे सगळं फक्त लोकांना दाखवण्यासाठी ती करते. मी किती शांत आहे, सभ्य आहे आणि मी किती सुशील आहे हे दाखवण्यासाठी सगळा ड्रामा करते."शेहबाज व तान्याच्या या भांडणामध्ये अभिषेक बजाजही तिच्याबद्दल प्रतिक्रिया देतो.

## न सांगता दिग्दर्शकाने शूट केला बलात्काराचा सीन



चित्रपटांच्या शूटिंगदरम्यान अभिनेत्रींना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. एखाद्या चित्रपटात इंटिमेट सीन दाखवायचे असतील किंवा बलात्काराचा सीन असेल तर त्याचं शूटिंग करणं अभिनेत्रींसाठी खूप अवघड असतं. आता सेटवर इंटिमेसी को-ऑर्डिनेटर असतात, पण काही वर्षांपूर्वीपर्यंत ही संकल्पना नव्हती. एका बॉलीवूड अभिनेत्रीला न सांगता बलात्काराचा सीन शूट करण्यात आला होता. तुम्हाला विश्वास बसणार नाही, पण हे खरं आहे. ९० च्या दशकातील लोकप्रिय अभिनेत्री आयशा जुल्काने अक्षय कुमारसह अनेक आघाडीच्या अभिनेत्यांबरोबर काम केलं आहे. ३२ वर्षांपूर्वी १९९३ मध्ये तिच्याबरोबर एक प्रसंग घडला होता. 'दलाल' नावाच्या चित्रपटात आयशाची मुख्य भूमिका होती. हा चित्रपट सुपरहिट ठरला होता, पण यामुळे आयशा मात्र वादात सापडली होती.'दलाल'मध्ये एक सीन होता, ज्याबद्दल दिग्दर्शक व निर्मात्यांनी आयशाला काहीच सांगितलं नाही. बलात्काराचा सीन तिच्या बॉडी डबलबरोबर शूट केला. या चित्रपटाचा ट्रायल झाल्यावर एका रिपोर्टरने आयशाला फोन करून या सीनबद्दल विचारलं. तू इतका बोल्ड सीन कसा केलास? हा प्रश्न ऐकताच आयशाला धक्का बसला होता.दलाल'चे दिग्दर्शक पार्थो घोष यांनी आयशाला न सांगता तिच्या बॉडी डबलबरोबर बलात्काराचा सीन शूट केला. या सीनमध्ये तिच्या अंगावर खूप तोकडे कपडे होते.

स्मृती मानधनाच्या सर्वाधिक धावा

## विश्वविजेतेपदानंतर सोशल मीडिया पोस्ट चर्चेत

# मानधनाचं रिझर्व्ह बँकेकडून कौतुक

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय महिला क्रिकेट संघाने २ नोव्हेंबर रोजी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील क्रिकेट स्टेडियमवर एकदिवसीय विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत पहिल्यांदाच जगजेत्तेपद मिळवले. या सामन्यात सलामी फलंदाज शफाली वर्माने अष्टपैलू कामगिरी करत आणि फिरकीपटू दिप्ती शर्माने ५ बळी घेत भारताच्या विजयाचा मार्ग सुकर केला.**

## भारतीय संघाला असेच यश मिळो



भारताच्या या विजयानंतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने एक्सवर एका पोस्टच्या माध्यमातून भारतीय महिला संघ आणि आरबीआयची अधिकारी सलामी फलंदाज स्मृती मानधनाचे अभिनंदन केले आहे. एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने म्हटले आहे की, “भारतीय महिला क्रिकेट संघाचे त्यांच्या ऐतिहासिक विश्वचषक विजयाबद्दल हार्दिक अभिनंदन! या विजयात उत्कृष्ट भूमिका बजावल्याबद्दल संघ सदस्य आणि आरबीआय अधिकारी स्मृती मानधनाचे विशेष अभिनंदन. पुढील काळातही भारतीय संघाला असेच यश मिळो ही आरबीआयची सदिच्छा आहे.”अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. त्यामुळे प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या भारतीय संघाला चांगल्या सुरूवातीची गरज होती. भारतीय संघाकडून डावाची सुरूवात करताना स्मृती आणि शफालीने मिळून शतकी भागीदारी केली. स्मृतीने ५८ चेंडूंचा सामना करत ४५ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान तिने ८ चौकार मारले. तिचे अर्धशतक थोडक्यात हुकले. पण भारताला अंतिम सामन्यात जशी सुरूवात हवी होती, तशी सुरूवात मिळाली.भारतात पार पडलेल्या या महिला एकदिवसीय विश्वचषकात स्मृती मानधना सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर राहिली. या स्पर्धेत स्मृती भारताकडून सर्वाधिक धावा करणारी फलंदाज होती. स्मृती मानधनाने स्पर्धेतील नऊ सामन्यांमध्ये ५४.२५ च्या सरासरीने ४३४ धावा केल्या. स्मृतीने या विश्वचषकात एक शतक आणि दोन अर्धशतकेही झळकावली.

भारताच्या अंतिम सामन्यातील विजयानंतर स्मृती मानधना म्हणाली होती की, “मला अजूनही कळत नाही, काय बोलू, काय प्रतिक्रिया देऊ. मी मैदानावर कधी भावुक होत नाही, पण हा कमालीचा क्षण आहे. प्रत्येक विश्वचषकांमध्ये आतापर्यंत अनेकदा निराशा पदरी पडली आहे. प्रत्येक वेळी मने दुखावली.

### विजयाबद्दल अभिनंदन!

स्मृती मानधना सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर राहिली. या स्पर्धेत स्मृती भारताकडून सर्वाधिक धावा करणारी फलंदाज होती. स्मृती मानधनाने स्पर्धेतील नऊ सामन्यांमध्ये ५४.२५ च्या सरासरीने ४३४ धावा केल्या. स्मृतीने या विश्वचषकात एक शतक आणि दोन अर्धशतकेही झळकावली. भारताच्या अंतिम सामन्यातील विजयानंतर स्मृती मानधना म्हणाली होती की, “मला अजूनही कळत नाही.

पण तरीही एक गोष्ट ठाम होती, आपली जबाबदारी फक्त जिंकण्यापुरती नव्हती, तर महिला क्रिकेटचा पाया अधिक मजबूत करण्याची होती. आणि खरेच सांगायचे, गेल्या दीड महिन्यात मिळालेल्या लोकांचा पाठिंबा अविश्वसनीय होता.”भारताच्या या विजयानंतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने एक्सवर एका पोस्टच्या माध्यमातून भारतीय महिला संघ आणि आरबीआयची अधिकारी सलामी फलंदाज स्मृती मानधनाचे अभिनंदन केले आहे. एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने म्हटले आहे की, “भारतीय महिला क्रिकेट संघाचे त्यांच्या ऐतिहासिक विश्वचषक विजयाबद्दल हार्दिक अभिनंदन! या विजयात उत्कृष्ट भूमिका बजावल्याबद्दल संघ सदस्य आणि आरबीआय अधिकारी स्मृती मानधनाचे विशेष अभिनंदन. पुढील काळातही भारतीय संघाला असेच यश मिळो ही आरबीआयची सदिच्छा आहे.”अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. त्यामुळे प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या भारतीय संघाला चांगल्या सुरूवातीची गरज होती. भारतीय संघाकडून डावाची सुरूवात करताना स्मृती आणि शफालीने मिळून शतकी भागीदारी केली. स्मृतीने ५८ चेंडूंचा सामना करत ४५ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान तिने ८ चौकार मारले. तिचे अर्धशतक थोडक्यात हुकले. पण भारताला अंतिम सामन्यात जशी सुरूवात हवी होती, तशी सुरूवात मिळाली.

# “सर प्रॉमिस लक्षात आहे ना?

## जेमिमाने वर्ल्डकप विजयानंतर गावस्करांना वचनाची करून दिली आठवण

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय महिला संघ वर्ल्ड चॅम्पियन ठरला आहे. २ नोव्हेंबरला डी वाय पाटील स्टेडियममध्ये झालेल्या भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील फायनमध्ये टीम इंडियाने ५२ धावांनी मोठा विजय मिळवला. यासह भारतीय महिला संघाने पहिल्यांदाच एकदिवसीय विश्वचषक जिंकला आहे.**



यापूर्वी सुनील गावस्करांनी भारत जर वर्ल्डकप जिंकला तर एक गोष्ट करणार असल्याचं वचन दिलं होतं. आता जेमिमा रॉड्रीग्जने व्हीडिओ शेअर करत ते वचन पूर्ण करण्यासाठी ती तयार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील अंतिम सामन्यापूर्वी सुनील गावस्कर यांनी जेमिमा रॉड्रीग्जबरोबर गाणं गाण्याचं वचन दिलं होतं. सेमीफायनलमध्ये ऑस्ट्रेलियाविरूद्ध वादळी खेळी करणारी जेमिमा तिच्या डान्स आणि गाण्यांसाठी प्रसिद्ध आहे. जर भारतीय महिला संघ फायनल जिंकला तर ते जेमिमाबरोबर गाणं गात या विजयाचा आनंद साजरा करायला आवडेल असं म्हणाले होते.भारताच्या विश्वचषक विजयानंतर जेमिमा रॉड्रिग्जने क्रिकेट दिग्गज सुनील गावसकर यांना अगदी संगीतपूर्ण पद्धतीने त्यांचं वचन पूर्ण करण्याची आठवण करून दिली आहे. महिला एकदिवसीय विश्वचषक जिंकल्यानंतर जेमिमाने इन्स्टाग्रामवर एक मजेशीर व्हिडिओ शेअर करत लिहिलं, तुमच्याबरोबर गाणं गाण्यासाठी वाट पाहत आहे.स्पोर्ट्स टुडेशी बोलताना सुनील गावसकर म्हणाले, “जर भारताने विश्वचषक जिंकला तर ती (जेमिमा रॉड्रीग्ज) तिच्याकडे तिचा गिटार असेल आणि मी तिच्यासोबत गाणं गाणार.

### खूप सारं प्रेम आणि खूप खूप आभार

ती गिटार वाजवत होती आणि मी गाणं गात होतो.”जेमिमाने शेअर केलेल्या या व्हीडिओमध्ये तिने सुनील गावस्करांना त्यांनी दिलेल्या वचनाची आठवण करून दिली. जेमिमा म्हणतेय, “हॅलो सुनील गावस्कर सर, तुम्ही म्हटलं होतं की भारतीय संघाने जर विश्वचषक जिंकला. तर आपण दोघं एकत्र गाणं गाऊ. मी गिटार घेऊन रेडी आणि तुम्हीही माईक घेऊन तयार असाल. खूप सारं प्रेम आणि खूप खूप आभार.”

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। बुधवार।
। दि. 5 नोव्हेंबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## पालकमंत्री शंभूराज देसाईंनी शिवेंद्रराजेंना डिवचले

# शिवसैनिकांचा अपमान झाल्यास जशास तसे उत्तर!

### दरवर्षी वाहून जाणारे डांबर हाच का जावलीचा विकास; लगावला टोला

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड:मेढा, कुडाळ, केळघर येणाऱ्या निवडणुकीत महायुतीमध्ये शिवसेना शिंदे गटाला कमी लेखण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषद निवडणुकीत शिवसैनिकांचा अपमान झाला तर जशास तसे उत्तर देऊ, असा दमदार इशारा पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी सातारा जावळीचे विधानसभेचे आमदार मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे नाव न घेता देत त्यांच्या मतदारसंघांमध्ये येऊन त्यांना डिवचले..**



मेढा येथे शिवसेनेचा संवाद मिळावा आणि अंकुश कदम यांची संपर्कप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल जाहीर सत्कार झाला. या कार्यक्रमासाठी पालकमंत्री शंभूराज देसाई उपस्थित होते. यानिमित्त महायुतीतील अंतर्गत मेढा संपर्कप्रमुखपदी निवड झाल्याबद्दल अंकुश कदम यांचा सत्कार करताना पालकमंत्री शंभूराज देसाई, समवेत शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते. तणाव जावळी तालुक्यात उफाळून आला. महायुतीत शिवसेनेचा दबदबा, अपमान सहन केला जाणार नाही असा इशाराच पालकमंत्र्यांनी दिला. संपर्कप्रमुख अंकुश बाबा कदम यांनी कुठे आहे जावलीचा विकास, विकास म्हणजे रस्ते आणि समाजमंदिरे होतो का? तालुक्यातील शेकडो मुले आज मुंबई पुण्यासारख्या शहरात कामानिमित्त जाऊन तालुका ओस पडला आहे. या रस्त्यावर चालायला देखील माणूस नाही. या तालुक्यातल्या युवकांना रोजगार नाही, दरवर्षी वाहून जाणारे डांबर हाच तालुक्याचा विकास का? माझ्या तालुक्यातल्या भाबड्या लोकांसोबत सेल्फी काढायचा व पाच वर्षे सत्ता गाजवायची हे राजकारण बंद करा व युवकांच्या हाताला रोजगार मिळेल यासाठी संधी उपलब्ध करून द्या अन्यथा आम्हाला या तालुक्यातल्या सुपुत्राला या तालुक्यातल्या सुपुत्रांसाठी या जावलीत उतरावं लागेल, असा सज्जड इशाराच कदम यांनी देत नाव न घेता शिवेंद्रराजेंना डिवचले. स्वतः शिवेंद्रसिंहराजे कसे उत्तर देतात याकडे आता सगळ्यांचे लक्ष आहे.

महायुती एकत्र आहे, एकजूट आहे, राज्यात केंद्रात शिवसेना शिंदे गट भाजप व राष्ट्रवादी अजित पवार गट असे प्रत्येक फलकावर तीन चिन्ह असतात मात्र मेढ्यातल्या शहरात भाजपवाले आमच्या कार्यकर्त्यांचे बॅनर लावू देत नाहीत, काढून घेतात, आमच्या पक्षाचा कार्यक्रम होऊ देत नाही हे आता कदापिही सहन केले जाणार नाही. माझ्या शिवसैनिकांना कुठेही धक्का लागला तर त्याला जशास तसे उत्तर दिले जाईल असा इशारा देखील जावळी तालुक्यातून तालुक्यातील भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांना पालकमंत्री शंभूराजे देसाई यांनी दिला आहे. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांची प्रतिमा आणि त्यांच्या अस्तित्वावर जर कोणी उठत असेल तर त्याला त्याच भाषेत उत्तर देऊ

#### भाजप व शिंदे गटात वाद पेटणार?

शिवसेनेच्या मेळाव्यातील त्या वक्तव्यामुळे जावळीतील राजकीय घडामोडी अचानकच चिघळल्या आहेत. पंचायत समिती व जिल्हा परिषदेसाठी उमेदवारीचा नवा तक्ता तयार होत असताना हा इशारा महत्त्वाचा मानला जात आहे. जावळीतील सत्ता समीकरणे पूर्वीसारखी सरळ राहतील, अशी शक्यताच उरलेली नाही. अनेक गावांमध्ये याबाबत चर्चा रंगल्या आहेत. सोशल मीडियावरही या वक्तव्याने धुरळा उडवला आहे. जावळीत महायुतीची परीक्षा आता खरी लागणार आहे. "महायुती आहे म्हणून शांत, पण शिवसेना आहे म्हणून सज्ज!" हा सवाल जावळीच्या राजकारणाला हादरे देत राहणार आहे. जावळी तालुक्यातील कार्यकर्ता मेळाव्यात त्यांनी हा संदेश देताच राजकीय वातावरण तापले आहे.

#### जावलीतील शिवसैनिकांमध्ये संचारले नवचैतन्य

जावली तालुक्यातील निवडणूक निरिक्षक म्हणून अंकुश बाबा कदम यांच्यावर जबाबदारी टाकली असून त्यांची निवड देखील करण्यात आली. त्यामुळे कार्यकत्यांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला. अंकुश कदम यांच्या शिंदे गटातल्या प्रवेशाने आता जावलीत शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून येणाऱ्या काळात अंकुश कदम यांच्या नेतृत्वात जावली तालुक्याच्या राजकारणाला नवी दिशा मिळणार आहे.

आणि आम्ही शांत बसणार नाही, असे स्पष्ट शब्दांत देसाई यांनी सांगितले. यावेळी या कार्यक्रमानिमित्त शिवसेना प्रवक्त्या ज्योती वाघमारे त्याचबरोबर सातारा जिल्हाध्यक्ष रणजीत भोसले, सहसंपर्कप्रमुख एकनाथ ओंबळे, उपजिल्हाप्रमुख संदीप पवार, विकास शिंदे, सचिन करंजेकर, समीर गोळे, प्रशांत तरडे, संजय सुर्वे, सतीश पवार, श्रीरंग गलगले, गणेश निकम, त्यासह शेकडो पदाधिकारी या कार्यक्रमानिमित्त उपस्थित होते.

## राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धेसाठी अंशुमन धावडे याची निवड

### शिक्षण विश्व: गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्सच्या गौरवात मानाचा तुरा

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित गायत्री इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, मोशी येथील इयत्ता अकरावीतील विद्यार्थी अंशुमन धावडे याने आपल्या मेहनत, शिस्त आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धेसाठी निवड मिळवत शाळेचा गौरव वाढविला आहे.**



अलीकडेच पार पडलेल्या विभागीय स्तरावरील मल्लखांब स्पर्धेत अंशुमनने अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत आपले कौशल्य दाखवले. त्याच्या चपळ हालचाली, शरीरसंतुलन आणि खेळातील निपुणतेमुळे त्याला परीक्षकांकडून विशेष प्रशंसा लाभली. याच कामगिरीच्या जोरावर त्याची राज्यस्तरीय संघात निवड झाली असून, या यशाने संपूर्ण गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्समध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यालयाचे मुख्याध्यापक यांनी सांगितले की, “अंशुमनचे यश हे त्याच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे फळ आहे. खेळ आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रांत तो नेहमीच तितकाच जागरूक आणि समर्पित असतो.”

संस्थेचे अध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी अंशुमनचे अभिनंदन करून त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. “अंशुमनने शाळेचा झेंडा राज्यस्तरावर फडकवला आहे. त्याच्या यशामागे शिक्षकांचा मार्गदर्शनशील प्रयत्न आणि पालकांचे प्रोत्साहन आहे,” असे भोंगाळे म्हणाले.

संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालिका कविता कडू पाटील यांनी सांगितले, “अंशुमनने आपल्या दैनंदिन परिश्रम, शिस्त आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे यश मिळवले आहे. त्याचे यश केवळ वैयक्तिक नाही, तर आमच्या संपूर्ण संस्थेचा अभिमान आहे.” शाळेतील शिक्षक, उपमुख्याध्यापक, सहकारी विद्यार्थी आणि पालकवर्ग यांनीही अंशुमनचे कौतुक करत त्याला भविष्यात राष्ट्रीय स्तरावर यश मिळवण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

राज्यस्तरावर आता अंशुमन आपले कौशल्य दाखवणार असून, त्याच्याकडून आणखी मोठ्या यशाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. गायत्री ग्रुप ऑफ स्कूल्ससाठी हे एक अभिमानास्पद यश ठरले आहे.

### आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत विविध महाविद्यालयांच्या संघांचा सहभाग

# डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाला दुहेरी मुकुट

## शिक्षण विश्व: आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत विजेतेपदाची कमान

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आकुर्डी या महाविद्यालयाने आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत दुहेरी विजेतेपद पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

या स्पर्धेत विविध महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग घेतला होता.पुरुष विभागात महाविद्यालयाच्या संघाने दमदार खेळी करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली तर महिला विभागातही संघाने उत्कृष्ट रणनीती आणि एकजुटीच्या बळावर विजेतेपद मिळवले. दोन्ही संघांनी आपापल्या विभागात प्रथम क्रमांक पटकावून महाविद्यालयाचा मान वाढवला.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पी. मालथी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सांगितले की विद्यार्थ्यांनी दाखवलेली एकाग्रता प्रेरणादायी आहे. दोन्ही संघांनी मिळवलेला दुहेरी मुकुट हा आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे असे त्या म्हणाल्या.

विजेत्या खेळाडूंना महाविद्यालयाच्या वतीने सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी ट्रस्टी तेजस पाटील, कॅम्पस डायरेक्टर निवृत्त अमित विक्रम आणि डीन डॉ. एस. एस.सरनोबत यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या यशस्वी कामगिरीत शारीरिक शिक्षण संचालक आबाजी माने यांचे मोलाचे योगदान राहिले. खेळाडूंना प्रशिक्षण देणे आणि त्यांच्यात खेळांसाठी रुची विकसित करणे यासाठी त्यांच्या प्रयत्नांचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. स्पर्धेचे आयोजन यशस्वीपणे पार पडल्याबद्दल आयोजक समितीचेही अभिनंदन करण्यात आले.

# आरक्षण सोडतीसाठी चंद्रकांत पुलकुंडवार प्राधिकृत अधिकारी

## पिंपरी महापालिका निवडणूक: 11 नोव्हेंबर रोजी होणार आरक्षण सोडत; राज्य निवडणूक आयोगाचे आदेश

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**आगामी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाच्या टप्प्याची म्हणजेच आरक्षण सोडतीची तारीख निश्चित करण्यात आली आहे. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी आरक्षण सोडत पार पडणार असून, या सोडतीच्या कामकाजासाठी पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**

राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकांणी यांच्या स्वाक्षरीने याबाबतचा अधिकृत आदेश जारी करण्यात आला आहे. या आदेशानुसार, पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडतीची संपूर्ण प्रक्रिया राबवली जाईल आणि सोडतीनंतरचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करण्यात येईल.

### आरक्षण सोडतीची तयारी अंतिम टप्प्यात

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवडणूक ही राज्यातील सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या महापालिका निवडणुकांपैकी एक मानली जाते. गेल्या काही महिन्यांपासून या निवडणुकीसंदर्भात प्रशासकीय तयारी सुरू असून, आता आरक्षण सोडतीच्या निर्णयामुळे निवडणूक प्रक्रियेला वेग आला आहे.

महापालिकेच्या निवडणूक विभागाने आरक्षण सोडतीसाठी आवश्यक माहिती, विभागनिहाय लोकसंख्या, अनुसूचित जाती-जमाती व महिलांचे प्रमाण या सर्व आकडेवारीचा अभ्यास सुरू केला आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आरक्षण ठरविण्यात येणार आहे.

### आयुक्त श्रावण हर्डीकर बिहार निवडणुकीचे निरीक्षक

दरम्यान, पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांची बिहार विधानसभा निवडणुकांसाठी निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे स्थानिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडतीसाठी स्वतंत्र जबाबदार अधिकारी नेमणे आवश्यक ठरले. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांची नियुक्ती केली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने जारी केलेल्या आदेशात नमूद केले आहे की, "सदर आरक्षण सोडतीची प्रक्रिया विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली पार पडावी आणि त्याचा तपशीलवार अहवाल आयोगास सादर करण्यात यावा."

### सोडतीसाठी राजकीय आणि सामाजिक संस्थांची उत्सुकता

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्ष, स्थानिक संघटना आणि सामाजिक संस्था यांच्यात आरक्षण सोडतीबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. प्रभागांचे आरक्षण जाहीर झाल्यानंतरच स्थानिक पातळीवरील उमेदवारीचे गणित स्पष्ट होईल. प्रत्येक प्रभागात कोणत्या गटासाठी आरक्षण लागू होणार, यावर आगामी राजकीय समीकरणे अवलंबून राहणार आहेत. यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये आरक्षण सोडतीच्या प्रक्रियेला अनेकदा कायदेशीर आक्षेप, आढावा आणि दाद मागण्यांची शक्यता दिसून आली होती. त्यामुळे या वेळी प्रशासनाने पारदर्शक व निष्पक्ष पद्धतीने सोडत पार पाडण्यासाठी सर्व तयारी केली असल्याचे सांगण्यात येत आहे.

### पारदर्शकतेसाठी खुली प्रक्रिया

राज्य निवडणूक आयोगाने सोडतीची प्रक्रिया सार्वजनिकरित्या पार पाडावी, असा स्पष्ट निर्देश दिला आहे. त्यामुळे नागरिक, स्थानिक प्रतिनिधी तसेच माध्यम प्रतिनिधींच्या उपस्थितीतच सोडत होणार आहे. प्रत्येक प्रभागासाठी लॉटरी पद्धतीने आरक्षण ठरवले जाईल. महिलांसाठी, अनुसूचित जाती-जमातींसाठी आणि इतर मागासवर्गीय घटकांसाठी आरक्षणाचा कोटा कायद्यानुसार निश्चित केला जाईल.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
Admission
Open
FOR 2026 – 27
Nursery – Std X
• CBSE Curriculum
• Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
• Digital Classrooms with AV Facilities
• Skill Development Programs including:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
• Focus on Holistic Development
Enroll Now!
Sunday Open: From 10 AM to 1 PM
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

## चित्तथरार काटे बारस-



पुणे: दरवर्षी प्रमाणे पुरंदर तालुक्याच्या गुळुंचे गाव येथे जोतीर्लिंग महादेव यात्रा निमित्त गुळुंचे गाव येथे काटे बारस यात्रा पार पडली. या उत्सवात शेकडो भविकांनी चक्क बाबळीच्या काट्यात उड्या घेऊन आपला नवस पूर्ण केला.
**(फोटो: विजयकुमार हरिश्चंद्रे)**



